# प्रकरण सहावे

# निष्कर्ष

पृष्ठ - १२० ते १२७

# प्रकरण सहावे
# निष्कर्ष

'मराठी कथेची पार्श्वभूमी' हे पहिले प्रकरण अभ्यासताना मला असे जाणवले की, मराठी कथा ही ग्रंथनिर्विष्ट होण्यापूर्वी दंतकथेच्या स्वरूपात समाजात प्रचलित होती. मराठीतील सर्वात आद्य कथासंग्रह म्हणून आपण म्हाइंभटाच्या 'लीळाचरित्राकडे' बोट दाखवितो. चक्रधर स्वामींच्या जीवनातील एक एक 'लीळा' म्हणजे एक एक चुटकेवजा गोष्टच होय. यानंतर कथेच्या स्वरूपात बदल होत गेल्याचे दिसते. मुद्रणकलेच्या शोधामुळे कथेस बहर आला आणि पूर्वीची 'श्रवणीय' गोष्ट 'वाचनीय' झाली. नंतर ती 'लघुकथा' बनली. मानवी जीवनाच्या विकासाबरोबर कथा हा वाङ्मयप्रकार विकसित झाल्याचे दिसते. हरिभाऊ आपटे यांनी 'करमणूक' या पत्रातून आपल्या 'स्फूट गोष्टी' लिहिल्या तसेच 'मनोरंजन' मासिकातून वि.सी. गुर्जर यांनी ७०० च्या आसपास कथा लिहिल्या. 'यशवंत किर्लोस्कर' या कालखंडात कथेने आपले स्वतंत्र तंत्र निर्माण केले. तर 'सत्यकथा-अभिरूची' या मासिकांतून नवकथाकारांनी कथेला समृध्द आणि संपन्न बनविले.

१९६० नंतर मात्र कथा या वाङ्मय प्रकारामध्ये विविध प्रवाह निर्माण झाल्याचे दिसतात. ग्रामीण कथा, प्रादेशिककथा, विनोदी कथा, स्त्रीकथा, अस्तित्ववादी कथा, भयकथा, अद्‌भुत कथा इ. विविध प्रकार उदयास आले. व्यंकटेश माडगूळकर, ग.ल. ठोकळ, आनंद यादव, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, डॉ. प्रतिमा इंगोले, हमीद दलवाई, रणजित देसाई, अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव, शंकरराव खरात, वामन होवाळ, विभावरी शिरूरकर, विजया राजाध्यक्ष, प्रिया तेंडुलकर, प्र. के. अत्रे, चि.वि. जोशी, सदानंद रेगे, रत्नाकर मतकरी, जयंत नारळीकर, कमल देसाई, दिलीप चित्रे, विलास सारंग इ. कथालेखक व कथालेखिकांनी कथावाङ्मयाला समृध्द केले. काळानुरूप कथावाङ्मय प्रकारात बदल होत असल्याचे दिसते.

'आधुनिक कथा आणि मराठीतील स्त्रीकथाकार' हे दुसरे प्रकरण अभ्यासताना मराठीतील स्त्रीकथाकारांची यादीच नजरेसमोर येते. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरूष तुलना' हे पुस्तक लिहून पुरूषी संस्कृतीचा खरपूस समाचार घेतला आहे. त्यांचे विचार जहाल स्त्रीवादाला शोभणारे आहेत. तसेच आनंदीबाई शिर्के, गिरिजाबाई केळकर, काशीताई कानिटकर ह्या कथालेखिका १९१५ पर्यंत कथालेखन करताना आढळतात. ना.सी. फडके आणि कथालेखिका वि.स. खांडेकर यांच्या कालखंडात विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे आणि मुक्ताबाई दीक्षित, पिरोज आनंदकर, मालतीबाई दांडेकर इ. नी कथालेखन केले. समाजाचे बदलते चित्रण, मार्क्सवाद, फ्रॉईडचे मनोविश्लेषण, गांधीवाद, विभक्त कुटुंबपध्दती या सर्वांचे चित्रण या कालखंडातील कथालेखिकांनी केले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र बेकारी, शहरीकरण, यंत्रयुगाचा वाढता प्रभाव, वाढती लोकसंख्या ह्या सर्व समस्या सुशिक्षितांना भेडसावू लागल्या आणि त्या सर्वांचे चित्रण कथालेखिकांनी आपल्या साहित्यातून शब्दबध्द केले.

विशेषत: स्त्रियांनी आपल्या साहित्यातून आई-मुलगी, वडील-मुलगा, सासू-सून, नातवंडे, प्रौढ कुमारिका, वृध्द आई-वडील, पांढरपेशा समाजाचे चित्रण केले. तसेच 'कुटुंबकथा' हे स्त्रियांचे अनुभवविश्व त्यांच्या साहित्यातून बऱ्याचवेळा वाचायला, अनुभवायला मिळते. दलित कथालेखन करणारी केवळ एकच कथालेखिका आढळते ती म्हणजे उर्मिला पवार होय. ग्रामीण कथा सरोजिनी बाबर, प्रतिमा इंगोले, अनुराधा गुरव यांनी आपल्या साहित्यातून समर्थपणे मांडली. ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान, दर्जा, पोषाख, शेती, शेतीतील अवजारे, विविध वृत्ती प्रवृत्तीच्या लोकांचे चित्रण त्यांनी आपल्या साहित्यातून केल्याचे दिसते. तर विज्ञानकथा माधुरी शानभाग, रेखा बैजल या लेखिकांनी लिहिल्या. तसेच स्त्रियासुध्दा विनोदी कथा लिहितात हे शकुंतला परांजपे, इंद्रायणी सावकार, शकुंतला बोरगावकर आणि शकुंतला फडणीस या लेखिकांनी दाखवून दिले. वास्तवाचे चित्रण करणाऱ्या अस्तित्ववादी कथालेखिका कमल देसाई,

सुकन्या आगाशे, मेघना फटांगरे ह्या होत. असेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांच्या लेखनात स्त्रीवादी जाणिवा उत्तरोत्तर वाढत गेलेल्या दिसतात. पण त्यातही नेमस्त स्त्रीवादी भूमिका बऱ्याच लेखिकांनी स्वीकारलेली दिसते. वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै, स्नेहलता दसनूरकर, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, सुमती क्षेत्रमाडे, योगिनी जोगळेकर यांच्या साहित्यातून नेमस्त भूमिकांचे दर्शन घडते. तर जहाल स्त्रीवादी लेखन करणाऱ्या गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, सानिया, आशा बगे ह्या कथालेखिका नव्या स्त्रियांच्या जाणिवांचा थेट व आक्रमक आविष्कार घडविताना दिसतात. अशा ह्या मराठीतील आधुनिक स्त्री कथाकार स्त्रियांच्या वेगवेगळ्या जाणीवा-नेणिवा प्रकट करताना दिसतात.

'डॉ. सौ. प्रतिमा इंगोले व्यक्ती व वाङ्मय' ह्या तिसऱ्या प्रकरणात प्रतिमा इंगोले यांची प्रकाशित पुस्तके, मिळालेले पुरस्कार आणि त्यांचे वाङ्मय यांचा आढावा घेण्याचा मी प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लेखन करणाऱ्या प्रतिमा इंगोले ह्या ग्रामीण कथाकार म्हणण्यापेक्षा त्या वऱ्हाडी कथाकार म्हणूनच खूप प्रचलित आहेत. त्या उत्कृष्ट कथाकथन करतात तसेच त्यांच्या एकूणच साहित्याचा आवाका खूप मोठा आहे. ग्रामीण लेखन करणाऱ्या लेखिकेत प्रतिमा इंगोले यांना अग्रगण्यच मानावे लागेल. १९६० नंतरच्या तरूण पिढीतील मोजक्याच लेखिका आहेत. त्यातीलच एक नाव म्हणजे डॉ. सौ. प्रतिमा इंगोले हे होय. त्यांच्या एकूणच वाङ्मयाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, त्यांच्या कथेतील पात्रे ही स्वत:च संवाद बोलतात असे वाटते. तसेच ग्रामीणांच्या भावभावना, सुखदु:ख, इच्छा-आकांक्षा, भोळेभाबडेपणा, अंधश्रध्दा, साधेपणा इ.चे चित्रण प्रतिमा इंगोले समरस होऊन करतात. त्यांच्या कथा रंजक-रोचक व वेधक झालेल्या आहेत. तेथील स्त्री-पुरूषांच्या वृत्ती-प्रवृत्तीचे चित्रण लेखिकेने कुठेही आडपडदा न ठेवता केले आहे. ग्रामीण भागातील रीती-रिवाज,

त्यांच्या श्रध्दा-अंधश्रध्दा, छंद, सणवार, राहणीमान, पोशाख इ. चे वर्णन त्यांच्याच बोलीत कलात्मक रीतीने साकार करण्याचा प्रयत्न केला आहे.

तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनमूल्यांचा त्यांनी शोध घेतला आहे. माणसातली माणुसकी जीवन जगताना जपली पाहिजे हे त्यांच्या कथा वाचून लक्षात येते. तसेच अलीकडे समाजात सर्वत्र चाललेला भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, क्रूरता, असुरक्षितता या सर्वांचे चित्रण त्यांच्या एकूणच वाङ्मयामधून येते.

'सुगरणचा खोपा' या कथासंग्रहात सर्वसामान्य माणूस हाच इंगोले यांच्या कथांचा नायक आहे. 'बिऱ्हाड' मधील पंचफुला, 'पेरणारे हात' मधला इतरांच्या शेतावर मशागत करणारा गुणवंतराव, 'भिंगरी' कथेतील आपल्याच माणसाकडून पिळली जाणारी गंगाबाई, 'सुगरणचा खोपा' मधील तरूण गौतम, 'भोवांडा' मधील शालक्या आणि 'धुईधानी' कथेतील साहेबराव इ. सर्व माणसे आपले हातावर पोट असणारी, कष्टकरी आहेत. तसेच 'लंगडा' कथेतील घोड्याच्या पिलाचा अमानुष छळ करणाऱ्या क्रूर लोकांचे वागणे मन सुन्न करून जाते. ग्रामीण भागातील वृध्द माणसांचे चित्रण त्या करतात. 'बिऱ्हाड' कथेतील पंचफुला व तिचा नवरा वृध्द आहेत पण त्यांना घराबाहेर हाकलले जाते. त्यांना चार सुखाचे घास खाता येत नाहीत तर 'मावळती' कथेत वृध्दत्वामुळे समाज बाबासाहेबांकडे दुर्लक्ष करतो. ग्रामीण वृध्द माणसांच्या दु:खाच्या कथा मनाला चटका लावून जातात. या कथा वाचल्यानंतर लेखिकेचे ग्रामीण जीवनाविषयीचे अनुभवविश्व आतून-बाहेरून सखोल असल्याचे त्यांच्या 'भिंगरी', 'धुईधानी', 'भोवांडा', 'बिऱ्हाड' या कथांमधून जाणवते. त्यामुळे त्यांच्या कथा वास्तव वाटतात.

या संग्रहात त्यांनी स्त्रियांच्या लहान-मोठ्या विविध प्रश्नांना महत्त्व दिले आहे. तसेच कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय स्तरांवर त्यांची कथा वावरताना दिसते. त्यांच्या कथेतील पात्रांची दु:खे एका व्यक्तीची असण्यापेक्षा मानवी समूहाची आहेत. त्यात स्वत:च्या दु:खाचा पदर नसतो असे नाही पण त्यांची दु:खे निर्माण झाली आहेत

ती त्यांनी एका विशिष्ट समाजात जन्म घेतल्यामुळे त्यांची दु:खे बरीचशी सारखीच आहेत. व्यक्तीची दु:ख व्यक्त करण्यात इंगोलेंनी ज्या प्रसंगाचा आधार घेतला आहे तो मात्र प्रत्ययकारी रीतीने चित्रित केला आहे.

कथेतील वातावरण निर्मितीचे प्रतिमा इंगोलेंचे कौशल्य उल्लेखनीय आहे. इंगोलेंची सूक्ष्म निरीक्षण शक्ती, बारीक तपशीलासह वातावरणात उभे करण्याचे कौशल्य हे त्यांच्या कथांच्या यशाचे खरे रहस्य म्हणता येईल. प्रतिमा इंगोलेंची निवेदनशैली परिणामकारक आहे. तिला वऱ्हाडी बोलीभाषेची जोड मिळाली आहे. छोट्या छोट्या अर्थपूर्ण संवादातून प्रतिमा इंगोले परिणामकारकता साधतात. आवश्यक त्या ठिकाणी वऱ्हाडी भाषेचा वापर करून कथा अर्थघन बनवतात.

प्रतिमा इंगोले यांची कथा ही प्रादेशिक कथा आहे. ग्रामव्यवस्थेतील कडू-गोड अनुभव त्या आपल्या 'लेक भुईची' या कथासंग्रहातून व्यक्त करतात. त्यांच्या कथांमधील स्त्री पात्रे ही परिस्थितीला शरण जाणारी असली तरी लाचार नाहीत. आलेल्या संकटांना तोंड दयायला ती समर्थ आहेत. या भुईच्या लेकी आलेल्या संकटांशी संघर्ष करण्यास सज्ज आहेत. त्यांचा हा संघर्ष जगण्यासाठीचा आहे. ग्रामीण भागातील स्त्री कितीही सुशिक्षित झाली असे म्हटले तरी त्यांचा मानसिक कोंडमारा होतो आहे. पुरूषांचे असणारे कुटुंबामधील वर्चस्व आणि सासूचा सासुरवास आजही या स्त्रियांना सहन करावा लागतो आहे. तसेच 'वटी' कथेतील मांगीण आपली वटी मिळावी म्हणून दुसऱ्याच्या दारात बसते. आपला धर्म ती सोडत नाही. 'दिठ' कथेतील सुशिक्षित व अशिक्षित स्त्रिया यांच्यामधील स्वभावधर्म विशद केला आहे. ग्रामीण जीवनातील स्त्रियांचा भोळे-भाबडेपणा, साधेपणा इंगोले आपल्या कथेतून व्यक्त करतात.

'डुबतीची पावलं' या कथेत भुईच्या लेकीची व्यथा मांडली आहे. तसेच जनकराव या शेतकऱ्याची दैन्यावस्थेचे चित्रण केले आहे. 'सपन' कथेत दहावीपर्यंत शिकलेल्या विमलचे लग्न परिस्थितीमुळे तिची आत्या नाकारते तर शेवटच्या कथेत

जिजाऊ सारख्या समर्थ स्त्रीचेही चित्रण त्या करतात. स्त्रियांचे मनोविश्व इंगोले आपल्या भुईच्या लेकीद्वारा मांडतात. तसेच ग्रामीण म्हणी आणि वाक्प्रचारांची रेलचेल त्यांच्या कथांमधून आढळते. त्यांच्या कथा थेट वाचकांच्या हृदयाला भिडणाऱ्या आहेत.

प्रतिमा इंगोले यांनी आपल्या साहित्यातून विविध विषय हाताळल्यामुळे त्या निश्चितच यशस्वी ठरल्या आहेत. तसेच विदर्भातील रीतीरिवाज, प्रथा, परंपरा, रूढी, श्रध्दा इ. महाराष्ट्रापासून अनेक दृष्टींनी वेगळ्या आहेत. ग्रामीण जीवनाचे केलेले सूक्ष्म निरीक्षण आपल्या विचारांना गती देणारे आहे. त्यांच्या प्रत्येक कथा स्वतंत्र आहेत. त्यात विविधता आहे. निखळ ग्रामीण समाजाचा वास्तवतेने शोध घेऊन त्यांनी हा कथासंग्रह लिहिला आहे. त्यांच्या कथा कुठेही प्रचारकी वाटत नाहीत. ग्रामीण जीवनाविषयीचा जिव्हाळा त्यांच्यां साहित्यातून उठून दिसतो.

इंगोले यांच्या कथेत कुठेही अश्लीलता दिसत नाही. कामुक वर्णनाची खैरात नाही. दाट शृंगाराची मेजवानी नाही, तोंडाला पाणी सुटावे असे सौष्टवपूर्ण शरीरवर्णने नाहीत. स्त्री-पुरूषांचे उघडे-नागडे विकृत संबंध नाहीत. तात्पर्य त्यांचे लेखन विकृतीसाठी नाही ते प्रकृतीसाठी आहे आणि त्यातून व्यक्त करावयाच्या संस्कृतीसाठी आहे. चौथ्या ग्रामीण पिढीतील इंगोले यांचे स्थान मानाचे आहे.

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील परिसर हा विदर्भातील आहे. त्या एक सरस ग्रामीण प्रादेशिक कथाकार आहेत. त्यांच्या कथासंग्रहाची शीर्षकि ही यथोचित नि सार्थ अशीच आहेत. तसेच कथेला दिलेली शीर्षके अतिशय समर्पक आहेत. प्रसंग, घटना, संवाद यामध्ये प्रत्येकाची ढब वेगळी आहे. प्रतिमा इंगोलेंनी स्त्री व्यक्तिरेखा सरस चितारल्या आहेत. तसेच वऱ्हाडी बोलीचा वापर करून म्हणी व वाक्यप्रचारांची पेरणी कथांमध्ये केलेली आढळते. त्यांच्या कथेतील पात्रे देवावर श्रध्दा असणारी, आहे त्या परिस्थितीला सामोरी जाणारी आहेत. कुठेही आक्रमकता त्यांच्यात दिसत नाहीत. तसेच प्रतिमा इंगोले कोणत्याही प्रकारचे भाष्य न करता संयमी वृत्तीने चित्रण करताना दिसतात. त्यांच्या कथेला विनोदाची झालर दिसत नाही. करूण रसात त्यांच्या कथा

बुडलेल्या दिसतात. त्यांनी वेगवेगळ्या वातावरणात व्यक्तिमनाच्या वृत्ती-प्रवृत्तीचे सूक्ष्म दर्शन त्यांच्या कथेमधून घडते. संयमित पण समृध्द अनुभवाच्या जोडीने माणसांचे जिवंत वास्तव चित्र रसिक वाचकांसमोर ठेवले आहे. व्यक्तीच्या वागण्या बोलण्यातून आणि विचार करण्याच्या पध्दतीतून त्यांचे स्वभाव उलगडत जातात. मात्र ही पात्रे कुणाला उपदेश करीत बसत नाही. स्वतःच्या परीने स्वभावधर्माने जीवन कंठत असतात. त्यांच्या कथेतील पात्रे भोळी-भाबडी, दुःखी-कष्टी, निराश, इमानी, साधी अशी भिन्न भिन्न प्रवृत्तीची माणसे त्यांच्या कथांत आढळतात.

प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा' व 'लेक भुईची' या दोन्ही कथासंग्रहातील कथांचा चिकित्सक अभ्यास केला असता असे जाणवते की, त्या ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करतात. तसेच स्त्रिया व पुरूषांचे चित्रण, त्यांची सुख दुःखे, भाव-भावना, इच्छा-आकांक्षा यांचे चित्रण करतात. तसेच मुक्या प्राण्यांचेही चित्रण करतात. शेतकऱ्यांचे जीवन चित्रण करतात. तसेच वऱ्हाडी बोलीभाषेतील संवाद, भाषाशैली, प्रतिमा यांचा सुरेख वापर करतात. प्रतिमा इंगोले विदर्भातील असल्यामुळे वैदर्भी बोलीचा आपल्या कथेत संवादासाठी वापर करतात. निवेदनांतही त्या भाषेचा ढंग आणतात. आशयाच्या गरजेनुसार म्हणी व वाक्यप्रचारांचा त्या यथायोग्य उपयोग करतात. निसर्गचित्रणाचा अभाव आढळतो.

वरील विवेचनावरून प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा' व 'लेक भुईची' या कथासंग्रहाचा चिकित्सक अभ्यास मी केला आहे पण हा अभ्यास करताना मराठी कथेची पार्श्वभूमी, आधुनिक कथा आणि मराठीतील स्त्रीकथाकार, प्रतिमा इंगोले व्यक्ती व वाङ्मय तसेच 'सुगरणचा खोपा' या पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन आणि 'लेक भुईची' या पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन या प्रकरणांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये अभ्यासक म्हणून मला जे काही भावले ते येथे नोंदवले आहे. ते सर्वमान्य होईलच असे नाही. मात्र या ठिकाणी एका निखळ

संशोधकाच्या भूमिकेतून 'प्रतिमा इंगोले' यांच्या 'सुगरणचा खोपा' आणि 'लेक भुईची' या कथासंग्रहांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

***